## नियमित दिवाणी दावा क्र. ०७/२०२१ मधील निशाणी १४९ खालील आदेश (MHRT08-000049-2021)

वादी वारस अ तर्फे प्रस्तुतचा अर्ज मयत वादीचे वारस अभिलेखावर आणण्यासाठी व सदर मयत वादी यांच्या नावापुढे 'मयत' असा शब्द लिहिण्याची परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. अर्जात असे कथन आहे की, वादी नामे श्रीकांत आत्माराम शिंदे हे दिनांक १८/०५/२०२५ रोजी मयत झाले आहेत. दावा हा वाटप व सततचे ताकिदीकरीता दाखल आहे. त्यामुळे वादीचे वारस अभिलेखावर आणण्यासाठी व वादीचे नावापुढे मयत असे लिहिण्याची दुरुस्ती करण्यासाठी परवानगी मागितली आहे. अर्जाच्या पृष्ठयर्थ निशाणी १५० अन्वये शपथपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर अर्जावर विरुध्द पक्षकारांचे म्हणणे मागविण्यात आले. विरुध्द पक्षकारांतर्फे विधीज्ञ श्री. पेडणेकर यांनी योग्य ते आदेश होण्याची विनंती केली आहे.

०३. वादी वारसांतर्फे विधीज्ञ श्री. सी. एम. मांगले व प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री. पेडणेकर यांना ऐकले. अभिलेख पाहिले.

०४. निशाणी क्रमांक १४८ वरील कागदपत्रांच्या यादीसोबत वादीचा मृत्यू दाखला हजर केला आहे. त्यावरुन त्यांचा मृत्यु दिनांक १८/०५/२०२५ रोजी झाला असल्याचे दिसून येते. प्रस्तुतचा अर्ज हा मुदतीत म्हणजेच दिनांक ०७/०७/२०२५ रोजी दाखल करण्यात आला आहे. दावा वाटपासाठी दाखल करण्यात आला असल्याने मयत वादीचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. त्यामुळे अर्जात मागितलेली दुरुस्ती मंजूर करणे गरजेचे आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे –

<u>आदेश</u>

१. अर्ज निशाणी १४९ हा विनाखर्च मंजूर करण्यात येतो.

२. वादी वारसांतर्फे अर्जामध्ये मागितलेली दुरुस्ती मुदतीत करुन त्याची दुरुस्त प्रत अभिलेखावर सादर करावी.

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.06.10 17:29:19 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

**दिनांकः १०.०६.२०२६** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देवरुख,**

**देवरुख.** **जि. रत्नागिरी.**

-: **<u>C E R T I F I C A T E</u>** :-

I affirm that the contents of this pdf file Order are same word as per original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | A. A. Shivalkar |
| Court Name | : | Civil Judge,(J.D.) & J.M.F.C., Deorukh |
| Date of Decision | : | 10/06/2026 |
| Order signed by Presiding Officer on | : | 10/06/2026 |
| Order uploaded on | : | 10/06/2026 |